असा. क्र. ३५

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, मार्च २, २००७/फाल्गुन ११, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ मार्च २००७.

### अधिसूचना

**नोंदणी अधिनियम, १९०८.**

क्रमांक आरजीएन. २००६/२३४४/प्र. क्र. ५०८/म-१.— नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, दिनांक २ मार्च २००७ पासून, पुणे (ग्रामीण) नोंदणी जिल्ह्यातील मुळशी उप जिल्हा आणि लोणावळा उप जिल्हा यांच्या हद्दींमध्ये फेरबदल करीत आहे आणि त्या प्रयोजनासाठी शासकीय



[ किंमत : रुपये ७.०० ]

(७)



अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र.आस्थापना २००५/१६९०/प्र.क्र. ३४२/म-१, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या दुसऱ्या अनुसूचीमधील पुणे (ग्रामीण) नोंदणी जिल्ह्यासंबंधीच्या नोंद क्र. १९ (ख) मध्ये,—

(क) स्तंभ (३) व स्तंभ (४) मध्ये नमूद केलेल्या मुळशी उप जिल्ह्यासंबंधीच्या उप-नोंदीमध्ये, " हवेली नोंदणी उप जिल्ह्याचा भाग असलेली ८ गावे वगळून मुळशी महसुली तालुका " या मजकुराऐवजी " हवेली नोंदणी उपजिल्ह्याचा भाग असलेली ८ गावे आणि लोणावळा नोंदणी उपजिल्ह्याचा भाग असलेल्या मुळशी महसुली तालुक्यातील १४ गावे वगळून मुळशी महसुली तालुका " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) स्तंभ (३) आणि स्तंभ (४) मध्ये नमूद केलेल्या लोणावळा उप जिल्ह्यासंबंधीच्या उप नोंदीमध्ये, " (५९) लोणावळा नगरपालिका (खंडाळा, लोणावळा, तुगार्ली, नांगरगाव, वळवण, भुसी) " या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" (५९) लोणावळा नगरपालिका (खंडाळा, लोणावळा, तुगार्ली, नांगरगाव, वळवण, भुसी) आणि मुळशी महसुली तालुक्यातील पुढील गावे—

(१) देवघर (२) नांदगाव (देवघर) (३) विसाखर (४) आंबवणे (५) जांभुळणे (६) पेठ शहापूर (७) कोळवडी (८) कुंभेरी (९) पोमगांव (१०) माजगांव (११) साळतर (१२) तिस्करी (१३) तैलबैला (१४) बारपे बुद्रुक " .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

द. रा. माळी,
शासनाचे सहसचिव.